आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१८ जून २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज शेतकरी सन्मान निधीचा पुढचा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करणार, राज्यातल्या ९० लाखांहून अधिक शेतकऱ्यांना होणार लाभ

- लोकसभा निवडणुकीचे एक्झिट पोल जाहीर झाल्यानंतर शेअर बाजारात आलेल्या तेजीप्रकरणी इंडिया आघाडीच्या खासदारांची सेबीकडे तक्रार

- यंदाचा आंतरराष्ट्रीय योग दिनाचा मुख्य कार्यक्रम श्रीनगरमध्ये

- चालू आर्थिक वर्षात भारताचा आर्थिक वृद्धी दर ७ पूर्णांक २ दशांश टक्के राहण्याचा फिच रेटिंग्ज चा अंदाज

**आणि**

- टी २० विश्वचषक स्पर्धेतले सुपर ८ देश निश्चित

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज उत्तर प्रदेशातल्या वाराणसीतल्या कार्यक्रमात प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजनेचा पुढचा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करणार आहेत. नऊ कोटी २६ लाख शेतकऱ्यांना याद्वारे २० हजार कोटी रुपयांहून अधिक लाभ होणार आहे. राज्यातल्या सुमारे ९० लाख ४८ हजार शेतकऱ्यांना या योजनेचे १ हजार ८४५ कोटी रुपये मिळणार आहेत.

देशातल्या ११ कोटींपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना तीन लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कमेचा लाभ झाला आहे. याच कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांच्या

हस्ते स्वयं सहाय्यता गटातील ३० हजारांहून अधिक महिलांना कृषी सखी प्रमाणपत्राचं वाटप करणार आहेत. निवडक ५० कृषी विकास केंद्रांवरही विशेष कार्यक्रमांचं आयोजन यावेळी केलं जाणार आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीचे एक्झिट पोल जाहीर झाल्यानंतर शेअर बाजारात आलेल्या तेजीप्रकरणी इंडिया आघाडीच्या खासदारांनी आज सेबीकडे तक्रार केली. हे एक्झिट पोल राजकीय हेतूने प्रेरित होते, त्यांनी शेअर बाजारात हस्तक्षेप केल्याचा आरोप तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी, सागरिका घोष, साकेत गोखले आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांनी केला आहे. निकाल जाहीर झाले त्या दिवशी शेअर बाजारात मोठी घसरण झाली. त्यामुळं गुंतवणूकदारांचे मोठे नुकसान झाले. याची चौकशी करण्याची मागणी त्यांनी सेबीच्या प्रतिनिधींची मुंबईत भेट घेऊन केली. भाजपा नेते अमित शहा यांनी वारंवार समभाग खरेदीचे सल्ले दिले, याचीही चौकशी करण्याची मागणी केल्याचं कल्याण बॅनर्जी यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. यापूर्वी या खासदारांनी शरद पवार यांची भेट घेतली.

**<><><><><>**

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जॅक सुलीवन यांच्यासोबत काल नवी दिल्लीत बैठक घेतली. यावेळी डोवाल आणि सुलीवन यांनी भारत आणि अमेरिका यांच्यात गंभीर आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानात धोरणात्मक भागीदारी वाढवण्याबाबत चर्चा झाली. सह-उत्पादन, सह-विकास आणि संशोधन आणि विकासाच्या संधींवर लक्ष केंद्रित करण्याचं  उद्दिष्ट असल्याचे अमेरिकेनं म्हटलं आहे.  या बैठकीत समविचारी

देशांसोबत समन्वय वाढवून तंत्रज्ञानाच्या उदयोन्मुख क्षेत्रात सहकार्य वाढवण्याची वचनबद्धता दोन्ही देशांनी व्यक्त केली.

या भेटीमुळे दोन्ही देशांमध्ये मजबूत भागीदारी आणि अधिक समृद्ध हिंद-प्रशांत क्षेत्र निर्माण होईल असं अमेरिकेनं म्हटलं आहे.

**<><><><>**

जम्मू-काश्मीरमधल्या रस्ते आणि महामार्ग प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली श्रीनगरमधल्या राजभवन इथं काल उच्चस्तरीय बैठक झाली.

झेड-मोर बोगदा, जम्मू रिंग रोड, उधमपूर-रामबन रस्त्याचे चौपदरीकरण या आणि अशा इतर महत्त्वाच्या प्रकल्पांवरही या बैठकीत चर्चा झाली.

**<><><><>**

सिक्कीम मधल्या चुंगथांग भागांत पूर स्थितीमुळं अडकलेल्या ५०० पर्यटकांची सुखरूप सुटका करण्यात सीमा रस्ते संघटन आणि मंगन जिल्हा प्रशासनाला आज यश आलं. अतिवृष्टी, खराब हवामान आणि भूस्खलनामुळं अत्यंत आव्हानात्मक बनलेल्या परिस्थितीत सुद्धा सीमा रस्ते संघटनेच्या कर्मचाऱ्यांनी बचाव कार्य सुरूच ठेवलं. इतर अडकलेल्या पर्यटकांची लवकरच हवाई मार्गानं सुटका करण्यात येईल, त्यासाठी सहा हेलिकॉप्टर्स बागडोगरा इथं तयार ठेवण्यात आली आहेत अशी माहिती, मंगन जिल्हा प्रशासनानं दिली आहे.

**<><><><>**

ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि डिजिटल क्रांतीत गावांना समाविष्ट करून घेण्याच्या उद्देशानं तयार करण्यात आलेल्या फाईव्ह -जी इंटेलिजन्ट व्हिलेज आणि क्वांटम एन्क्रिप्शन अल्गोरिदम या उपक्रमांत सहभागी

होण्यासाठी प्रस्ताव मागवले आहेत. तंत्रज्ञान आराखडा, विकास आणि दूरसंचार उत्पादनं आणि उपायांचं व्यापारीकरण याबाबींशी संबंधित उद्योग, सूक्ष्म , लघु आणि मध्यम उद्योगांना, स्टार्टअप्स, सरकारी विभागांना या उपक्रमात सहभागी होण्यासाठी आमंत्रित केलं आहे. कृषी, शिक्षण, आरोग्य, व्यवस्थापन आणि शाश्वत विकास या मूलभूत विकासाच्या क्षेत्रांमध्ये फाईव्ह -जी तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करून ग्रामीण भागांत आमूलाग्र बदल घडवून आणणं हे फाईव्ह-जी इंटेलिजन्ट व्हिलेज या उपक्रमाचं मुख्य उद्दिष्ट आहे. तर क्वांटम एन्क्रिप्शन अल्गोरिदम या उपक्रमाच्या माध्यमातून क्वांटम मेकॅनिक्स च्या साहाय्यानं ग्रामीण भागात डिजिटल संवाद साधनं निर्माण करण्याचं उद्दिष्ट आहे.

**<><><><><>**

योग आणि भरड धान्याच्या संबंधित जागरुकता निर्माण करुन लोकांचं आयुष्य सुदृढ करण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशभरातल्या सरपंचांना केलं आहे. पंचायत, शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्र आणि इतर ठिकाणी योग आधारित कार्यक्रमांचं आयोजन करण्याचं आवाहन त्यांनी सरपंचांना पत्र लिहून केलं आहे.

स्वतःसाठी आणि समाजासाठी योग ही यंदाच्या १० व्या आंतरराष्ट्रीय योगदिनाची संकल्पना आहे. यामुळं सुदृढ राष्ट्रनिर्माण करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांना बळ मिळेल, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

यंदाच्या आंतरराष्ट्रीय योगदिनाचा मुख्य कार्यक्रम श्रीनगरमध्ये शेर-ए-कश्मिर आंतरराष्ट्रीय कन्व्हेन्शन सेंटरमध्ये होणार आहे. सर्वसामान्य नागरिकांसह प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यात सहभागी होतील, अशी माहिती आयुष खात्याचे

राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत दिली. योगासनांवर आधारित प्रोफेसर आयुष्मान योग विशेष या कॉमिक पुस्तकाचं अनावरणही त्यांनी आज केलं.

<><><><><>

चालू आर्थिक वर्षात भारताचा आर्थिक वृद्धी दर ७ पूर्णांक २ दशांश टक्के राहील, अशी शक्यता फिच रेटिंग्जनं वर्तवली आहे. मार्च महिन्यात त्यांनी ७ टक्के वृद्धी दराचा अंदाज वर्तवला होता. वाढलेली गुंतवणूक आणि वाढलेल्या खर्चामुळं यात सुधारणा केल्याचं फिच नं म्हटलं आहे. जागतिक वृद्धी दर २ पूर्णांक ४ दशांश टक्क्यांच्या ऐवजी २ पूर्णांक ६ दशांश टक्के असेल, असंही फिचनं म्हटलं आहे.

<><><><><>

श्रीलंकेच्या नौदलानं सागरी  हद्दीत घुसखोरी केल्याबद्दल नेदूनथिवू जवळ आज  चार  भारतीय मच्छिमारांना  ताब्यात घेतलं. त्यांना पुढच्या चौकशीसाठी कनके सनथुराई बंदरात नेण्यात आलं आहे.

<><><><><>

चित्रपटांमधल्या योगदानाबद्दल चित्रपट निर्माते विनोद गणात्रा यांना दक्षिण आफ्रिकेचा प्रतिष्ठित नेल्सन मंडेला जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार' मिळालेले ते पहिले भारतीय ठरले आहेत. ७व्या नेल्सन मंडेला बालचित्रपट महोत्सवात बालचित्रपटांमध्ये त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल या पुरस्कारानं त्यांना सन्मानित करण्यात आलं.

<><><><><>

टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत सुपर ८ संघ निश्चित झाले आहेत. सुपर ८ च्या पहिल्या गटात  भारत, ऑस्ट्रेलिया, बांगलादेश आणि अफगाणिस्तान तर दुसऱ्या

गटात अमेरिका, इंग्लंड, वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिकेचा समावेश आहे. सुपर ८ फेरीतला पहिला सामना उद्या अमेरिका आणि दक्षिण आफ्रिकेत खेळला जाईल. तर भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात २० मे रोजी सामना होणार आहे. दोन्ही गटातल्या प्रत्येकी दोन सर्वोत्तम संघांना उपांत्य फेरीत प्रवेश मिळणार आहे.

**<><><><><>**

भारताच्या अंकिता रैना हिने इटलीत होत असलेल्या डब्ल्यू टी ए वेनेतो ओपन टेनिस स्पर्धेत महिला एकेरीत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळवला आहे. तिने चेक रिपब्लिकच्या डोमिनिका साल्कोव्हा हिचा ७-५, ६-३ असा सरळ सेटमध्ये पराभव केला.

**<><><><><>**

वन्य जीवांचे नैसर्गिक अधिवास त्यांच्या मूळ स्वरूपात जतन करण्यासाठी युरोपियन युनियनच्या पर्यावरण मंत्रालयानं निसर्ग जतन कायद्याला मान्यता दिली आहे. सार्वजानिक  लाईव्ह स्ट्रीम च्या माध्यमातून या निर्णयावर मतदान घेण्यात आलं होतं. अनेक वर्षांपासून याविषयी लढा सुरु होता. हिरवीगार वने पुन्हा तयार करणं, नद्यांची खोरी  आणि  त्यांचे  प्रवाह  त्यांच्या मूळ स्वरूपात आणणं हा निसर्ग जतन कायद्याचा मुख्य उद्देश आहे.

**<><><><><>**

पाकिस्तानसाठी हेरगिरी करणारा शास्त्रज्ञ निशांत अग्रवाल याच्या वैयक्तिक संगणकात  आयएसआयच्या हेरांनी ३ ॲपद्वारे घुसखोरी करून माहिती चोरी केल्याचं तपासात उघडकीला आलं आहे, असं उत्तर प्रदेशाचे दहशहतवाद विरोधी पथकाचे अधिकारी पंकज अवस्थी यांनी या खटल्यादरम्यान दिलेल्या जबाबात सांगितलं आहे.

**<><><><><>**

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन या आठवड्यात उत्तर कोरियाला भेट देणार आहेत. रशिया आणि उत्तर कोरिया यांच्यातली द्विपक्षीय भागीदारी पुन्हा सुरू होण्याची शक्यता असताना पुतिन यांच्या भेटीचं नियोजन करण्यात आल्याची माहिती उत्तर कोरियाच्या वृत्तसंस्थेनं दिली आहे.

**//<><><><><>//**